# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक १४.०४.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १३.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १ केसमध्ये ०१ असे एकूण ०७ इसमावर कारवाई करून एकुण २९,४९,९६०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०९ इसमांवर कारवाई करुन एकूण १,४२,८००/— रु. चा मुद्येमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,५०२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,४३,९५०/—रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा, युनिट क्र. ४ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचे ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०७.०४.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक ०८.०४.२०२६ चे ०८.१० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, प्लॉट नं. ६७, श्रीहरी नं. ०१, मानेवाडा रोड, अजनी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी नरेश दशरथ कांबळे, वय ५१ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन बहिणीचे घरी अमरनगर, हुडकेश्वर येथे मुक्कामी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ५९,५००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,७१,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन आरोपी नामे पियुष उर्फ भांजा राजू शाहू वय २२ वर्षे, रा. इंदीरानगर, जाटतरोडी, इमामवाडा, नागपुर यास ताब्यात घेवुन, त्यास विचारपूस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा त्याचे ०२ विधीसंघर्षग्रस्त बालक साथीदारांसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन रोख ५,०००/—रू. व सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकूण १,६५,४००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत एक असे एकुण ०२ घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीकडुन ०२ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव अजनी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती नंदा मनगटे व त्यांचे पथकाने केली आहे.



**३) गुन्हेशाखा, युनिट क्र. १ पोलीसांची कामगीरी :— चेन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०४.०४.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, फिर्यादी नामे श्रीमती अनुपमा अशोक शिरास वय ७७ वर्षे, रा. स्वप्निल त्रिशा अपार्टमेंट, बुटी ले आऊट, लक्ष्मीनगर, नागपुर हया मॉर्निंग वॉक करुन पायदळ जात असता, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत, जैन मंदीराचे पाठीमागे, लक्ष्मीनगर येथे एका २५ ते ३० वर्ष वयाचे इसमाने फिर्यादीजवळ येऊन, फिर्यादीचे गळ्यावर थाप मारून फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन वजनी अंदाजे १० ग्रॅम किंमती ६०,०००/—रू. ची जबरीने हिसकावुन ॲक्टिवा गाडीने पळुन गेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे आरोपीविरूध्द कलम ३०९(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा, युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपीस निष्पन्न केले व सापळा रचुन बुटीबोरी येथून आरोपी नामे सचिन नत्थु शाहू वय २५ वर्षे, रा. बाळाभाऊपेठ, गोरोबा मंदीरजवळ, पाचपावली, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्याने वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन सोन्याची लगड वजनी १० ग्राम व गुन्ह्यात वापरलेली ॲक्टीवा दुचाकी क्र. एमएच ४९ बीएफ ५१६८ असा एकुण १,००,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव बजाजनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, सपोनि सचिन भोंडे, राजाभाऊ जाधव, पोउपनि ओमप्रकाश कोठे, सफौ. विनोद देशमुख, पोहवा रितेश तुमडाम, मनोज टेकाम, प्रितम यादव, पोअं. कुणाल गेडाम, चापोहवा अजमत शेख यांनी केली.

(गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १३.०४.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, नंदनवन पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, हसनबाग चांदणी चौक येथे एक इसम शस्त्र बाळगून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचे ईसमाकडे जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख फहीम शेख अजीज वय ३८ वर्षे, रा. गल्ली क्र. ४, कल्याण बेकरीजवळ, हसनबाग, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, आरोपीचे काळया रंगाचे पॅन्टचे कंबरेत एक लोखंडी धारदार चाकु मिळून आल्याने किंमती ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे कळमणा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०९.०४.२०२६ चे १४.०० वा. ते दिनांक १३.०४.२०२६ चे १२.१५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, प्लॉट नं. ६३, ध्रुव एन्क्लेव्ह जवळ, गणेश चौक, नेताजीनगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी लोकेश नत्थुलाल अमृते वय ३६ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाकडे बारसे समारंभाकरीता रायपुर, छत्तीसगढ येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, दोन्ही बेडरूममधील लाकडी आलमारीचे कुलूप तोडून आत ठेवलेले सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती २,०५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. सचिन वाकलेकर ८८३०५७६६६९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यू)

**<u>पोलीस ठाणे खापरखेडा</u>** :— दिनांक १०.०४.२०२६ चे १४.०० वा. ते १४.३० वा. चे दरम्यान, महिला नामे श्रीमती इंदुबाई भिमराव बोंडे वय ६५ वर्ष रा. खापा पाटण, ता. कामठी जि. नागपूर हया त्यांचा नातु हिमांशु देवानंद बोंडे वय २५ वर्ष याचेसह त्याचे पॅशन मोटार सायकल क्र. एमएच ४० एएल १२१५ वर मागे बसून पाटणसावंगी येथे जात असता, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत तांदुळवाणी पुलाचे अगोदर रोडवर असलेल्या खचक्यामुळे मोटार सायकल उसळल्याने मागे असलेल्या श्रीमती इंदुबाई या खाली पडून गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना उपचाराकरीता पाटणसावंगी व तेथून मेडीकल हॉस्पिटल, नागपुर येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक १३.०४.२६ चे २०.४० वा. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोहवा गजानन राजूरकर ९९२३०७४७४६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे हुडकेश्वर</u>** :— संदीप लक्ष्मण करंडे वय ३२ वर्षे, रा. महाकाली नगर झोपडपट्टी, चर्चजवळ, बेलतरोडी गावाजवळ, हुडकेश्वर नागपूर हा दिनांक १२.०४.२०२६ चे दुपारी १५.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. आजपावेतो घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा—लांब, बांधा—

सडपातळ, उंची– ५ फुट ५ इंच, केस– काळे पांढरे, अंगात– पोपटी रंगाचे फुल शर्ट व काळया रंगाचा जिन्सपॅन्ट सुट घातलेला आहे. भाषा– मराठी पुर्णपणे बोलता येत नाही. तोतडा बोलतो गतीमंद असून फिटचा आजार आहे.



संदीप

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | अप.क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०८, नागपुर. | पोलीस ठाणे कोतवाली अप. क्रं ३५८/२०२२ | कलम ४२०,५०६ भा.दं.वि. | सुनिल जुझारुलाल धनगर वय २३ वर्ष रा. वार्ड ने. १८, गुर्जरबडीया, पोलीस ठाणे अफझलपुर जि. मंदसौर, मध्यप्रदेश. | १६.०४.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**